THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 31ST JANUARY 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे, मुंबई, तारीख २० माहे डिसेंबर सन १८९४.

**नंबर १०९१९.**—सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट ह्याच्या ७ व्या कलमामध्यें दिलेले अधिकार चालवून आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजूरी आणवून, आलीजा गव्हर्नर साहेब बहादूर इन् कौन्सिल ह्यांनीं, सन १८८७ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, ह्याच्या ९९९ व्या पृष्ठावर प्रसिद्ध करण्यांत आलेला जाहिरनामा, नंबर ४११६, ह्यांतील कानूंपैकीं कानू नंबर २७ हिच्या ऐवजीं खालील कानू केली आहेः—

खालीं निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक अमलदारास, ह्याखालीं त्याच्या त्याच्या बाबतींत निर्दिष्ट केलेल्या प्रदेशामध्यें खालीं लिहिल्याप्रमाणें करण्याचा अख्त्यार आहे : ह्मणजेः—

(अ) ज्या कोणत्याही जागेमध्यें, गाडीमध्यें अगर तारवामध्यें, सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट ह्याअन्वयें दिलेल्या लैसेन्साबरहुकुम कोणताही बारीपदार्थ तयार करण्यांत येत असेल, कबजांत ठेवलेला असेल, वापरण्यांत येत असेल, विकण्यांत येत असेल, एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत येत असेल, अगर बाहेरील प्रदेशांतून आणण्यांत येत असेल, अगर ज्या जागेमध्यें, गाडीमध्यें अगर तारवांध्यें सदर्हू आक्टाविरुद्ध किंवा सदर्हू आक्टाअन्वयें केलल्या कानूंविरुद्ध कोणताही बारी पदार्थ तयार करण्यांत आला आहे अगर येत आहे, कबजांत ठेविलेला आहे अगर ठेवण्यांत येत आहे, वापरण्यांत आला आहे अगर येत आहे, विकण्यांत आला आहे अगर येत आहे, एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्यांत आला आहे अगर येत आहे अगर बाहेरील प्रदेशांतून आणण्यांत आला आहे अगर येत आहे असें वाटण्यास सदर्हू अमलदारास कारण असेल त्या जागेंत, गाडींत अगर तारवांत शिरून त्याची पाहाणी आणि तपासणी करण्याचा अख्त्यार आहे ;

(ब) त्यांत बारी पदार्थ शोधण्याचा अख्त्यार आहे ;

(क) त्यांत सांपडलेल्या कोणत्याही बारी पदार्थाचे नमुने, त्यांची किंमत देऊन घेण्याचा अख्त्यार आहे ; आणि

(ड) त्यांत सांपडलेल्या ज्या कोणत्याही बारी पदार्थासंबंधानें सदर्हू आक्टाच्या अगर सदर्हू आक्टाअन्वयें केलेल्या कानूंच्या ठरावांचा भंग झालेला आहे असें वाटण्यास कारण असेल तेव्हां तो पदार्थ आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें धरण्याचा, अटकावून ठेवण्याचा, काढून नेण्याचा, आणि, सार्वजनिक सलामतीस आवश्यक असल्यास, त्याचा नाश करण्याचा, अख्त्यार आहे.

मात्र इतकेंच कीं,—

(१) जेव्हां जेव्हां खडकी येथील गनपौडर फ्याक्टरीचे सुपरिंटेंडंट अगर असिस्टंट सुपरिंटेंडंट किंवा जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील कोणताही माजिस्ट्रेट किंवा इन्स्पेक्टराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाहीं अशा ज्या कोणत्याही पोलीस अमलदारास मुंबई शहर व बेट येथील पोलीसकमिशनर हे ह्यासंबंधानें मुद्दाम नेमितील तो पोलीस अमलदार असा कोणताही बारी पदार्थ पकडील, अटकावून ठेवील किंवा काढून नेईल, तेव्हां तेव्हां, त्यानें, प्रसंगाप्रमाणें, जिल्हा माजिस्ट्रेटाकडे अगर पोलीस कमिशनर, मुंबई, ह्यांकडे त्याबद्दल रिपोर्ट केला पाहिजे;

(२) सदर्हू फ्याक्टरीच्या सुपरिंटेंडंटांस किंवा असिस्टंट सुपरिंटेंडंटांस, अगर जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील कोणत्याही माजिस्ट्रेटास, अगर मुंबई शहर व बेट येथील पोलीस कमिशनर ह्यांनीं इन्स्पेक्टराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाहीं अशा ह्यासंबंधानें मुद्दाम नेमिलेल्या कोणत्याही अमलदारास, प्रसंगाप्रमाणें जिल्हा माजिस्ट्रेटाची अगर पोलीस कमिशनर ह्यांची आधीं मंजुरी घेतल्याशिवाय असा कोणत्याही बारी पदार्थाचा नाश करण्याचा अधिकार नाहीं.

**स्थलमर्यादा.**

| | |
|---|---|
| इलाख्याच्या सर्व भागांत ... ... ... | खडकी येथील गनपौडर फ्याक्टरीचे सुपरिंटेंडंट. |
| | खडकी येथील गनपौडर फ्याक्टरीचे असिस्टंट सुपरिंटेंडंट. |
| आपापल्या जिल्ह्यांत ... ... ... | सर्व जिल्हा माजिस्ट्रेट. |
| आपापल्या हुकुमतीखालील प्रदेशांत ... ... | जिल्हा माजिस्ट्रेटाच्या ताब्यांतील सर्व माजिस्ट्रेट. |
| मुंबई शहर व बेट ह्यांत ... ... ... | पोलीस कमिशनर. इन्स्पेक्टरच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाहीं अशा ज्या कोणत्याही पोलीस अमलदाराला पोलीस कमिशनर ह्यासंबंधानें मुद्दाम नेमितील, तो प्रत्येक पोलीस अमलदार. |

२. खडकी येथील गनपौडर फ्याक्टरीचे सुपरिंटेंडंट आणि असिस्टंट सुपरिंटेंडंट ह्यांस, अनुक्रमें, बारी पदार्थांचे चीफ् इन्स्पेक्टर आणि असिस्टंट इन्स्पेक्टर नेमिलें आहे.

आलीजा गव्हर्नर साहेब बाहादुर इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. न्यूजंट,

चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे, मुंबई, तारीख ७ माहे जानेवारी सन १८९५.

नंबर ९२.—हिंदुस्थान सरकारचा खालील जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असे :—

"फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हिन्यू.

स्टांप.

नान् जुडीशियल.

माफी, वगैरे.

मुकाम कलकत्ता, तारीख २७ माहे डिसेंबर सन १८९४.

नंबर ६२१८—एस्. आर.—ज्या अर्थी मुंबई बंदराच्या ट्रस्टींस १,९१,००० रुपयांची जी रकम कर्जी काढण्याचा अधिकार दिला होता, ती रकम खालील डिबेंचर ह्मणजे—

रु०

नंबर १२०१ ते १३९१, तारीख १७ नव्हेंबर १८९४, प्रत्येकीं किंमत रुपये १०००.......१,९१,०००

हे डिबेंचर काढून कर्जी काढण्यांत येऊन, त्या रकमेवर पडणाऱ्या स्टांप ड्यूटीबद्दल, फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंटांतील ठराव नंबर ३६४६,* तारीख १३ माहे नव्हेंबर सन १८८० ह्यांतील शर्तीं अन्वयें ७९९ रुपयांची उक्ती रकम सदरहू ट्रस्टींनीं सरकारच्या तिजोरींत भरली आहे, त्या अर्थी, हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला) ह्याच्या ८ व्या कलमावरून दिलेला अधिकार चालवून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं, सदरहू डिबेंचरांवर एऱ्हवीं जी कोणतीही स्टांपड्यूटी पडती, मग ती ते काढतेवेळीं असो, नवीन करतेवेळीं असो, एकाऐवजीं अनेक करतेवेळीं असो, अगर अनेकांऐवजीं एक असा करतेवेळीं असो, ती त्या डिबेंचरांस माफ केली आहे.

*तारीख १८ माहे नव्हेंबर सन १८८० चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठ ९४५, ह्यावर पुनः प्रसिद्ध केलेला.

(सही) स्टीफन जेकब,

आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. न्यूजंट,

चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS